Anekant Education Society's

# Anekant Institute of Management Studies, (AIMS) Baramati

---

**Eassy Competition**

| | |
|---|---|
| **Date** | : 22th January 2022 |
| **Participants** | : Shinde SumitTanaji, Mayuri Bhosale, Amol Bhosale |
| **Topic** | : "Challenges of Marathi Literature in Digital Era" |
| **Winner** | : Sumit Shinde |
| **Total Participants** | : 03 |

Mrs.P.D.Hanchate
Coordinator,Sansruti Club,AIMS

Dr.U.S.Kollimath
Academic Coordinator,AIMS

Amol Rajendra Bhosale, MBA-I (2)

# डिजिटल युगात मराठी साहित्यासमोरील आव्हाने

'इंडिया आणि 'भारत' दोन्हीकडे स्मार्टफोनवर व्हिडीओ पाहण्याचं प्रमाण प्रचंड वाढलं आहे. जवळपास ४० कोटी फोनवर व्हिडीओ बघतात. थोडक्यात वेब स्ट्रीमिंगचं क्षेत्र हे सोन्याचं अंडं देणारी कोंबडी ठरणार आहे. या क्षेत्रातून मिळणाऱ्या आकडे डोळे विस्फारून टाकणारे असतील हे नक्की.

भारत हा प्रचंड विरोधाभासांनी भरलेला देश आहे. या देशात अणुऊर्जा वापरली जाते आणि शेणाच्या गोवऱ्या जाळूनही ऊर्जानिर्मिती केली जाते. या देशात नरिमन पॉइंट आहे आणि याच देशात धारावीची झोपडपट्टी आहे. जगातले काही सर्वाधिक श्रीमंत लोक याच देशात आहेत आणि याच देशात कित्येकांचे दरडोई उत्पन्न बावीस रुपयेही नाही. वाढत्या डिजिटल युगात वाचन, लेखन, यासारख्या मराठी साहित्य विचाराकडे कमी पाहिले जात आहे.

मोबाइल हा आता सध्या एक अवयवच बनल्यासारखा झाला आहे. अगदी अपवादात्मक परिस्थिती वगळता जिथं तिथं आपण जातो तिथं आपला मोबाईल आपल्यासोबतच असतो. एकेकाळी फक्त इनकमिंग कॉल उचलण्यापुरता उपयोग असणारा मोबाईल आता आपल्याला वेळपण दाखवतो. सकाळी अलार्म वाजवून आपल्याला उठवतो, आपला दिवस प्लॅन करून देतो, व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यात आपल्या जबाबदाऱ्या हलक्या करून देतो. याच मोबाइल हँडसेटने आपल्याला दिलेली मोठी सोय म्हणजे आपल्याला मोबाईलच्या स्क्रीनवर चित्रपट आणि गाजलेल्या मालिकाही बघता येतात. 'रिलायन्स' अतिशय स्वस्त सेल्युलर क्षेत्रात जी क्रांती आणली, त्याचे दूरगामी परिणाम झाले. अतिशय स्वस्त सेल्युलर डेटा जिओने आपल्या ग्राहकांना द्यायला

सुरुवात केली. नाइलाजाने का होईना इतर सेल्युलर कंपन्यांना पण जीओच्या किंमती गिरवाव्या लागल्याच. त्यांनी तसं केलं नसतं, तर त्यांच्या बाजारपेठेला टक्का घसरून जीओची मक्तेदारी प्रस्थापित होण्याचा धोका होता. या स्वस्त झालेल्या डेटामुळेच नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राइम, हॉटस्टार यांचे सुगीचे दिवस सुरू झालेत.

अनेकजण थिएटरमध्ये जाऊन सिनेमा पाहात नाहीत किंवा पाहू शकत नाहीत. कामातून वेळ न मिळणं, सिनेमागृहाची महागडी तिकिटं, पाकुणच्या मल्टिप्लेक्समध्ये होणारा बेसुमार खर्च, इतर प्रेक्षकांच्या हल्लडबाजीमुळे, हाणामारी आणि मोबाईलवर सातत्याने बोलणे, घरात लहान मुलं असणं, चित्रपट वितरणातल्या त्रुटीमुळे छोट्या गावात किंवा शहरात सिनेमे न लागणं अशा अनेक कारणांमुळे खूप प्रेक्षकांना थिएटरमध्ये जाऊन सिनेमा पाहण्यावर मर्यादा पडतात.

भारतात स्मार्टफोनवर व्हिडीओ पाहण्याचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. मोबाईलवर वेळ घालवण्याची सरासरी वेळ आपल्या देशात सातत्याने वाढत आहे. आपण स्वतःचाच विचार केला तर दिवसभरात आपण किती वेळ मोबाईलच्या स्क्रीनकडे पाहण्यात घालवतो. भारतात जवळपास २० कोटी लोक फोनवर व्हिडीओ पाहतात. थोडक्यात वेब स्ट्रीमिंगच क्षेत्र सोन्याचं अंडं देणारी कोंबडी ठरणार आहे. या क्षेत्रातून मिळणाऱ्या महसुलाचे आकडे डोळे विस्फारून टाकणारे असतील हे नक्की.

माणसाची दिवसाची सुरुवात ही डिजिटल झाली आहे. डिजिटल माध्यमांच्या साहाय्याने माणसाचं जीवन हे चालले आपल्याला दिसत आहे. सकाळपासून उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रत्येकजण हा डिजिटल म्हणजे मोबाईल अशा उपकरणाचा वापर करत आहे.

Bhosale R.R.

सकाळी अलार्म वाजण्यापासून ते संध्याकाळी शुभरात्री असा मॅसेज करण्यापर्यंत दिनचर्या चालत आहेत. डिजीटल माध्यमामूळे लोकांची राहणीमानाची सर्व कामे ही डिजीटल झालेली आहेत. पहिल्या काळात सकाळी कोंबडा ओरडला की सर्वजण जागी होत असेल पण आताकडे माणूस हा खूप आळशी आणि इतरां- वर अवलंबून राहिलेल्या दिसतो. मराठी साहित्याला आजीना लुटण्यासाठी प्रत्येक माणसाला हा हाक जेव्हा पुरेलच याची मला शंका येते.

आधुनिकच्या काळात डिजीटलच्या वापरामूळे पुस्तके, कांदबरी, कविता, श्लोक यासारख्या मराठी साहित्याकिलाच्या वापर कमी होत चाललेला दिसत आहे. या नवीन जगात व्हाटसअॅप सारख्या अॅपवर स्टेटस पाहणे, मॅसेज पाठवणे, मॅसेज व फाईल शेअर करणे, फोटो पाहणे. तसेच इन्स्टा सारख्या अॅपच्या माध्यमातून रिअलस पाहणे, व्हिडीओ पाहणे, अशाप्रकारे तरुणाई अडकलेली दिसते. युट्यूबच्या माध्यमातून व्हिडीओ पाहणे. डिजीटल जरी फायदेशीर आहे पण त्याचा जास्त वापर करणे हे सुदृढ्या शरीरासाठी धोकादायक आहे. अशा गोष्टीमूळे मराठी साहित्याकांचा वाचक कमी होत आहे.

सोशल मिडीयाच्या या जगात मराठी साहित्य कमी प्रमाणात वाचले जात आहे.

डिजीटल पायरसी करणारा काहींस ओळखीरी, निष्काळजीपणा दिसून येतो, तर काही जणात [illegible] प्रवृत्ती दिसून येते. अशा दोन्ही प्रवृत्तींच्या विरोधात कडक कारवाई करण्याची तीव्र गरज आता निर्माण झाली आहे. या दृष्टीने आता काही प्रकाशक व लेखकांनी पावले उचलेली असून संबंधितांच्या ओरीही चालू आहेत. पण हेच मूळ मुद्दा आहे तो जनजागृतीचा.

Bhosale A.R.

अलीकडे मित्र-मैत्रिणींचे पुस्तक आणायचे, झेरॉक्स करून द्यायचं आणि आपलं वाचनप्रेम व्यक्त करायचं आता तर तंत्रज्ञानामुळे त्यातलीही पुढची पायरी गाठलेली आहे. आपल्या आवाजात कथा, लेख रेकॉर्ड करून व्हायरल करणाऱ्यांची फौजच समाज माध्यमांवर कार्यरत झाली आहे.

अनेक लोकप्रिय पायरसींनी, पाच-सातशे ठोकळे रस्त्यावर तीस चाळीस रुपयात मिळत मग 'नैतिक मूल्य' वगैरे धाब्यावर मध्यमवर्ग, विद्यार्थीवर्ग ही पुस्तक सहज उचलू लागला. अशा काळात सर्जनशील लेखनाची प्रक्रिया मंदावत जाईल. दर्जेदार लेखन करणाऱ्या लेखकांच्या उत्साह ओसरू लागेल आणि सर्जनशील साहित्याच्या निर्मितीलाच्या खीळ बसेल. दर्जेदार पुस्तकांच्या वैध व्यवहार हळूहळू मंदावत आहे.

मराठीमध्ये हजारो लाखो कवी, लेखक, कादंबरीकार नाटककार आहेत

उदा: वामनदादा कर्डक यांच्यानंतर एक हजार पेक्षा जास्त कविता, भीमगीते आहेत. वयाच्या २३ व्या वर्षी मराठी अक्षर शिकण्यास त्यांना सुरुवात केली. अशक्य ते शक्य करून त्यांनी दाखविले आणि महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण जगात आपला ठसा उमटविला. त्यांना हजारो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वयाच्या २२-२३ व्या वर्षी अक्षर शिकणारे मराठी साहित्यिक घडले अशा थोर कवी साहित्यिकांचा मला अभिमान वाटतो.

लेखन गायना बरोबरच समाज प्रबोधनकार भीमशाहीर, लोकशाहीर बनले. आपल्या लेखणीचा वापर त्यांनी समाज सुधारण्यासाठी केला, गौतम बुद्ध, आंबेडकर विचारांच्या या कवीस मराठी साहित्यिकांचा, मी मराठी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे....

Mayuri Ravindra Bhosale, MBA-I


****** ——— ******* ———

# डिजिटल युगात मराठी साहित्यासमोरील आव्हाने

——— ***** ——— ***** ———

आमुच्या लहानग्यात रंगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलांत हासते मराठी
येथल्या दिशादिशात दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरूलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी.

स्वत:च्या घरात आणि समाजातही एक तुटलेपणा यांच्यावर लादले जात आहे. येत्या शतकात मराठीपण संपूर्णत: हरवलेला आणि सकस इंग्रजीकरणापर्यंत न पोचलेला असा एक अस्मिताहीन, बाजारू समाज आपल्याला येथे निर्माण करावयाचा आहे का? याचा विचार धोरणकर्त्यांनी करावयास हवा. पदवीधर होऊनही दोन ओळी नीट न लिहिता येणे किंवा मुद्देसूदपणे आपले विचार व्यक्त न करता येणे हे आजचे वास्तव आहे. आजची शिक्षणव्यवस्था मराठीकडे फार गांभीर्याने पाहत नाही, हेच यातून सूचित होते. मराठी मातृभाषा - राजभाषा म्हणून तिला कायम दुय्यम २० स्थानावर ठेवायचेही आपले शैक्षणिक धोरण आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य मराठी शाळांतून हीच स्थिती दिसते.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून मराठी जवळपास हद्दपार झालेली आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावर मराठीचा अभ्यासक्रम अध्ययन - अध्यापन यांचा दर्जा कमालीचा घसरता आहे. पुरेसे विद्यार्थी कागदोपत्री दाखवून विभाग टिकवून ठेवण्यात प्राध्यापक धन्यता मानत आहेत.

शिक्षणाचे माध्यम व मराठी मराठीपुढील सर्वात मोठे आव्हान शिक्षणाच्या क्षेत्रात आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे राज्यभाषेला स्पर्शही न होता, विदयार्थी अंतिम पदवीपर्यंत पोहचू शकतो. हा चमत्कार फक्त महाराष्ट्रात घडत असेल. आपल्याला शिक्षणप्रसाराचे काम करायचे आहे, की मुलांच्या स्वाभाविक जीवनधारणेवर वेगळ्या जीवनपद्दतीचे आरोपण करायचे आहे, हे विसरले जात आहे. स्वभाषेपासून मुलांना दूर नेणे म्हणजे त्यांची सामाजिक पाळेमुळे खणून काढणे आहे. आजच्या इंग्रजीच्या चेहरा हा व्यापारी आणि कारखानदारी बाजारपेठेचा असल्याने सर्वसाधारणपणे विदयार्थ्यांना कोणतीच बांधीलकी राहत नाही.

सर जॉर्ज ग्रिअर्सनच्या लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया (1903 - 1923) नुसार भारतात त्या काळात 179 भाषा आणि 544 बोली अस्तित्वात होत्या. 1961 च्या जनगणनेनुसार 1652 भाषा भारतात बोलल्या जात होत्या. जी भाषा दहा हजारांपेक्षा जास्त संख्येच्या जनसमूहांमध्ये बोलली जात असेल, त्याच भाषेचा जनगणनेमध्ये मातृभाषा म्हणून समावेश करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. त्यामुळे भारतीय भाषांची नेमकी संख्या आजही उपलब्ध नाही. भाषा धोक्यात आलेल्या देशांमध्ये भारत प्रथम क्रमांकावर असून 198 भारतीय भाषा मृत्यूपथावर आहेत. असा इशारा युनेस्कोने दिला आहे.

विदयार्थ्यांची उपस्थिती, अध्यपन - अध्यापनाचा दर्जा व अपेक्षित / उद्दिष्टपूर्ती / कौशल्यप्राप्ती यांची सदय: स्थिती असत चिंताजनक आहे. सामाजिकशास्त्रे व मानव्यविदयांचे शिक्षण सामान्यत: मराठी माध्यमातून दिले जाते. महाविदयालयातून विदयार्थ्यांना चांगली दर्जेदार पाठयपुस्तके, संदर्भग्रंथ उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे बहुसंख्य विदयार्थी गाइडे वाचून पदवी व पदव्युत्तर पदवी उच्च श्रेणीत मिळवतात.

अशा परिक्षार्थी शिक्षणपद्दतीतून बाहेर पडलेल्या विदयार्थ्यांचा ज्ञानात्मक, गुणात्मक स्तर कोणता असणार? जागतिकीकरणाच्या आजच्या तीव्र स्पर्धेत ते कितपत टिकाव धरणार? असे अनेक प्रश्न यासंदर्भात निर्माण होतात. आज मराठी भाषेचे शिक्षण म्हणजे मराठी ललित साहित्याचे शिक्षण अशी स्थूलमानाने स्थिती आहे. यात आता व्यावहारिक मराठी, विविध विदयांच्या अभ्यासासाठी मराठी असे अधिक व्यापक होणे सुरू झाले आहे. पदव्युत्तर अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत.

गेल्या साठ वर्षात ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास करण्याचे प्रयत्न गांभीर्याने झालेले नाहीत ए एखादी भाषा केवळ शिक्षणाचे माध्यम बनल्याने ज्ञानभाषा होत नसते. जेव्हा त्या भाषेत ज्ञाननिर्मिती होते. ज्ञान पसरवू लागते. तेव्हा ती ज्ञानभाषा होते.

अधुनिकीकरणाचे, यांत्रिकीकरणाचे बोलींवर आक्रमण होत असून कृषिजनसमूहातील पारंपारिक ज्ञान, संस्कृती मागे पडत चालली आहे. बृहन महाराष्ट्रातील विद्यार्थी घरात मराठी बोलत असले तरी घराबाहेर त्या प्रदेशाची भाषा किंवा इंग्रजी, हिंदीत बोलतात. त्यामुळे त्यांचे मातृ-भाषेशी नाते तुटण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आवश्यक असल्याचे गुजरातमधील मराठी शाळांमधील शैक्षणिक अधिकारी, विश्वस्त सांगत आहेत.

(1) सुमित तानाजी शिंदे
MBA - I

डिजिटल युगात मराठी साहित्यासमोरील आव्हाने...

एकवीसावे शतक ! एकवीसावे शतक हे अनेक नव-नवीन गोष्टी, संकल्पना, तंत्रज्ञान आणि आव्हाने घेवून आलेले आहे. 'बदल' ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. म्हटले जाते की, 'बदलांविना कर्म नाही आणि कर्माविना प्रगती नाही.'

अशाच अनेक बदलांतील एक बदल म्हणजेच आलेले अथवा दरवाज्यात उभे ठाकलेले डिजिटल युग ! काळ बदलतो तसा काळानुसार गरजा, साहित्य हे सर्वच बहुधा बदलते. अशीच नवीन आव्हाने घेवून डिजिटल युग हे आलेले आहे. ही आव्हाने साहित्यिक, वाचक, गरजू या सर्वांनाच पेलवायची आहेत. शेवटी आव्हाने आली तर त्यांच्यावर वार करण्याची वृत्ती ही साहित्यातूनच समाजास मिळत असते. त्यामुळे काही क्वचित उदाहरणे सोडली तर मराठी साहित्यावर विशेष असा प्रतिकूल परिणाम होण्याची चिन्हे कमीच आहेत.

डिजिटल युगात वाचनप्रेम, साहित्यप्रेम, पुस्तकप्रेम हे निश्चितपणे विरोधाभासी चित्र तयार करीत आहे. महात्मा फुलेंनी जसे जाणले की, 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली.' तशीच काहीशी अवस्था सध्याच्या डिजिटल

युगात घडताना दिसत आहे. साहित्याचे महत्त्व हे संस्कृती व जडणघडणीत अनन्यसाधारण असते. हा नवीन काळ मराठी साहित्यापासून समाजास दूर ढकलत चाललेला आहे.

कोणताही सृजनशील समाज हा साहित्याशिवाय अपूर्ण असतो. डिजिटलतेमुळे मराठी साहित्याकडे झुकण्याऐवजी समाजवर्ग अन्यत्र आकर्षित होत आहे. मराठी साहित्य नक्कीच जनमानात लोकप्रिय आहे, मग ते व.पु. असोत की अत्रे की प्रबोधनकार ठाकरे. साहित्य हे डिजिटल स्वरूपातदेखील उपलब्ध करण्याची घटिका ही आलेली आहे. कमी होत असलेली पुस्तकविक्री ही देखील डिजिटल युगाचे फळ आहे.

भारताच्या सुवर्णकाळ असताना भारतीय साहित्य हे जगासाठी कुतुहलाचा विषय होते. मात्र आज डिजिटल युगामुळे हेच साहित्य काहीसे मागे पडत चाललेले आपणांस दिसते. मराठी साहित्यिकांनी आता वाचकांची गरज, आवड जाणून घेण्याची वेळ आलेली आहे.

आदर्श नागरिक घडविताना साहित्याचा वापर होणे गरजेचे आहे मात्र सध्यातरी तसे चित्र नाही. शाळेपर्यंत असलेले मराठीचे साहित्याचे धडे महाविद्यालयांतदेखील अतिरिक्त विषय ठेवून आपण सुरू ठेवायला हवेत का की जेणेकरून युवकांमधील साहित्यप्रेम टिकून राहिल या यक्ष प्रश्नासह मी थांबतो.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी कॅम्पस, टी सी कॉलेज रोड बारामती जि.पुणे ४१३१०२ महाराष्ट्र.

दुरध्वणी क :( ०२११२) २२७२९९ वेबसाईट : www.aimsbaramati.org संपर्क :director.aimsbaramati@gmail.com

दिनांक. २२/०१/२०२२

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सुमित तानाजी शिंदे यांनी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दि. २२/०१/२०२२ ला आयोजित केलेल्या 'मराठी भाषा निबंध' स्पर्धेत सर्वोत्कृष्ट निबंध लेखन केले.

शैक्षणिक समन्वयक
डॉ.यु.एस.कोळ्ळीमठ

सांस्कृतिक समन्वयक
प्रा.पी.डी.हंचाटे

संचालक
डॉ.एम्.ए.लाहोरी

## Sanskruti Club

## Essay Writing Competition

**List of Participated Students**

**Date:22nd January,2022**

| Sr.No. | Name of the Student |
|---|---|
| 1 | Amol Bhosale |
| 2 | Mayuri Bhosale |
| 3 | Sumit Shinde |

**Name of Event Coordinator: Mrs. P.D.Hanchate**

AES'S ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES BARAMATI PUNE 6731